सामान्य माणसाचा उंचावलेला स्वर

# चपराक

संपादक : घनश्याम पाटील

- वर्ष : ६
- अंक : १६
- पाने : ८
- पुणे

मूल्य ₹ ३

www.chaprak.com

एकदा वापरून पहाच!

KaMant masale

किंग ऑफ टेस्ट

व्हेज-नॉनव्हेजचे स्वादिष्ट मसाले

संपर्क : डी. एम. कामंत फूड प्रॉडक्टस् प्रा. लि.
तिरूमला इंडस्ट्रियल इस्टेट, प्लॉट नं. ४,
टाटा जॉन्सन कंपनीसमोर, हिंजवडी, पुणे ४११ ०५७
दूरध्वनी ०२०-६५२९२४००

Email : dkamant@rediffmail.com Web. : www.kamantmasale.com

■ सोमवार दि. ०२ मे ते ०८ मे २०१६ ■ RNI No. MAHMAR/2011/35979 ■ पोस्टल नोंदणी क्र. : PCW/159/2014-2016

■ Licensed to post without prepayment of postage no. **WPP - 14** ■ Posted at Pune PSO on every wednesday, date of publication 02/05/2016

# माझ्या 'मराठी'ची बोलू कौतुके!

**संपादकीय**

घनश्याम पाटील : ७०५७२९२०९२

**हैदराबाद!** या शहराविषयी मला बालपणापासूनच प्रचंड कुतूहल. मी मूळचा मराठवाड्याचा. १५ ऑगस्ट १९४७ ला देश स्वतंत्र झाला; मात्र पुढचे तेरा महिने म्हणजे १७ सप्टेंबर १९४८ पर्यंत आम्हाला पारतंत्र्यातच राहवे लागले. (दुष्काळ, नापिकी ही मराठवाड्याच्या पाचवीला पूजलेली. त्यात देश स्वतंत्र्य झाल्यानंतर आम्हाला तेरा महिने उशीरा स्वातंत्र्य मिळाले. त्यातूनच 'दुष्काळात तेरावा' अशी म्हण प्रचलीत झाली असावी!) मराठवाड्यावर निजामाचे साम्राज्य होते. त्यामुळे हैदराबाद संस्थान आणि क्रूरकर्म्या निजामाच्या छळकथा शालेय जीवनापासूनच ऐकत, वाचत आलेलो. स्वामी रामानंद तीर्थ आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मराठवाडा मुक्ती संग्रामाचा जो यशस्वी लढा दिला तो फार महत्त्वाचा आहे. अशा या हैदराबादला एकदोनदा जाण्याचा योग आला पण तो केवळ काही कामानिमित्त!

मागच्या महिन्यात हैदराबाद मराठी साहित्य परिषदेच्या कार्यवाह डॉ. विद्या देवधर यांचा दूरध्वनी आला आणि त्यांनी हैदराबाद साहित्य परिषदेच्या ५८ व्या वर्धापनदिनानिमित्त पाहुणा म्हणून उपस्थित राहण्याचे निमंत्रण दिले. मूळचा 'मराठवाडी' असल्याने मुक्ती संग्रामाचा लढा डोळ्यासमोर तरळू लागला. तब्बल ५८ वर्षे इथं मराठी साहित्य परिषदेचं असं काय काम सुरू आहे, असंही वाटून गेलं. महाराष्ट्रात मराठीची होणारी गळचेपी आणि दुरवस्था पाहता या लोकांनी त्यांचं 'मराठीपण' कसं टिकवलंय हे पाहण्याची इच्छा मनात निर्माण झाली आणि मी त्यांना कार्यक्रमाला येण्यासाठी लगेच होकार दिला.

मी, माझे सहकारी माधव गिर, महेश मांगले आणि तुषार उथळे असे चौघेजण या कार्यक्रमासाठी जायचे ठरले. त्यातच लातूरहून मराठवाडा साहित्य परिषदेचे कोषाध्यक्ष भास्कर बडे त्यांच्या कवी मित्रांसह येणार असल्याचे कळले. म्हणजे हैदराबादेत मराठीचा आवाज दमदारपणे घुमणार हे नक्की होतं. बरं, डॉ. विद्याताई देवधर यांचं कामही सुपरिचित. त्या अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या उपाध्यक्षा. साहित्यिक चळवळीत कायम सक्रिय. त्याहून महत्त्वाचे म्हणजे 'चपराक' दिवाळी अंकाच्या लेखिका. मग म्हटले बघूया काय अनुभव येतो ते!

२४ एप्रिलला पहाटे आम्ही भावनगर एक्सप्रेसने हैदराबाद गाठले. हैदराबाद मराठी महाविद्यालयाचे प्राचार्य गोविंद देशमुख स्वागतासाठी आले होते. त्यांनी महाराष्ट्र मंडळात आमच्या निवासाची व्यवस्था केलेली. सकाळी प्राचार्य देशमुखांशी आम्ही चर्चा सुरू केली आणि हैदराबादच्या मराठी माणसांचे एकेक कंगोरे समोर येऊ लागले.

देशमुखही मूळचे लातूरचे. गेल्या काही वर्षापासून हैदराबादेतील मराठी महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून ते काम पाहतात. या महाविद्यालयाची ते माहिती सांगू लागले. तब्बल ५८ वर्षापूर्वी हैदराबाद मराठी साहित्य परिषदेची स्थापना झाली आणि त्याचवेळी या महाविद्यालयाचा जन्म झाला. म्हणजे देशभरात अशी एकमेव मराठी साहित्य परिषद आहे की जी, मराठी महाविद्यालय चालवते! तेही परिषदेच्या स्थापनेच्या पहिल्या दिवसापासून! फार मोठी गोष्ट आहे ही! प्रत्येक मराठी माणसाचा उर अभिमानाने भरून यावा अशी!

देशमुखांनी सांगितलं, 'हैदराबादेत जवळपास आठ लाख मराठी माणसं आहेत. मराठवाडा, विदर्भ येथून मुलं नोकरीच्या निमित्तानं या महानगरात येतात. त्यांना काहीतरी काम करत, कुटुंबाला हातभार लावत शिक्षण पूर्ण करायचं असतं. त्यामुळं हे सायंमहाविद्यालय सुरू झालं.'



आम्ही शब्दशः भारावून गेलो. पुण्या-मुंबईसारख्या शहरात मराठी शाळा धडाधड बंद पडत असताना हे लोक भाषा, संस्कृती जपण्यासाठी अहोरात्र कष्ट उपसत आहेत. मला कधी एकदा हे महाविद्यालय पाहतोय असं झालं होतं. देशमुखांना मी तशी गळ घातली. ते म्हणाले, 'सध्या मुलांच्या परीक्षा सुरू आहेत. त्यामुळं आत्ता महाविद्यालयात कोणीही नसेल!' त्यांना म्हणालो, 'हरकत नाही. आम्हाला या ज्ञानकेंद्राचं, पवित्र वास्तुचं दर्शन घ्यायला आवडेल.'

त्याचवेळी डॉ. विद्याताई देवधर, माधवराजे चौसाळकर, अर्चना अचलेकर, प्राचार्य गोविंद देशमुख, माजी प्राचार्य सुरेश कुलकर्णी ही सारी मंडळी जमली होती. लातूरहून डॉ. भास्कर बडे, आजच्या मराठवाड्याचा सांस्कृतिक आवाज असलेले अंबेजोगाई येथील कवी दिनकर जोशी, नागेश शेलार, लक्ष्मण खेडकर, शैलजा कारंडे, मेनका धुमाळे, गोविंद कुलकर्णी, पार्वती फड, नभा बडे हे सर्वजण आले होते. कवी माधव गिर, समीक्षक महेश मांगले, तुषार उथळे यांच्यासह आम्ही आमचा मोर्चा मराठी महाविद्यालयाकडे वळवला.

डॉ. विद्या देवधर यांनी या महाविद्यालयाची माहिती दिली. येथून अनेकांनी एम.ए., एम. फिल, पीएचडी केलेली आहे. पूर्वी संध्याकाळी सहा वाजता हे महाविद्यालय सुरू व्हायचे. सध्याचा जमाना मॉल्सचा. त्यामुळं हे मोठमोठे मॉल रात्री उशीरापर्यंत चालू असल्याने कामगार वर्गाची लवकर सुट्टी होत नाही. परिणामी विद्यार्थीसंख्या रोडावली आहे. ज्यांना हैदराबादमध्ये नोकरी करून शिक्षण पूर्ण करायचे आहे त्यांनी या महाविद्यालयाशी आवर्जून संपर्क साधावा. अशा विद्यार्थ्यांची सोय व्हावी यासाठी रविवारीही विशेष वर्ग घेतले जातात.

मराठी महाविद्यालयाची टोलेजंग इमारत बघितल्यानंतर आम्ही पोहोचलो हैदराबादच्या मराठी ग्रंथ संग्रहालयात. ही वास्तुही भव्यदिव्य आहे. पुणे मराठी ग्रंथालयाच्या तोडीस तोड पुस्तके. मुख्य शहरात यायची गैरसोय टाळता यावी यासाठी या ग्रंथालयाने हैदराबाद शहरात आणखी चार शाखा चालू केल्या आहेत. सर्वत्र वाचकांची वर्दळ. मराठीविषयीचा जिव्हाळा कुणालाही सहजपणे जाणवेल. सकस वाचनासाठी हे लोक प्रयत्नपूर्वक वेळ काढतात. पुण्यासारख्या सांस्कृतिक महानगरीने शरमेने मान खाली घालावी इतकी यांची उच्च सांस्कृतिक अभिरूची. मराठी महाविद्यालय आणि मराठी ग्रंथसंग्रहालय येथील कर्मचाऱ्यांचा अपवाद वगळता कार्यवाहासह सर्वजण विनामानधन येथे काम करतात हे एकच उदाहरण त्यासाठी पुरेसे!

'चपराक'चा अंक इथं कायम 'वेटींग'ला असतो. 'या अंकाचे संपादक आलेत' असं कळल्यानंतर कर्मचाऱ्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी आमचे जोरदार स्वागत केले. 'चपराक'च्या काही लेखांवर चर्चा झाली. त्यांनी आमच्यासोबत फोटो काढून घेतले. त्यांचे प्रेम, जिव्हाळा, त्यांच्याकडून मिळणारा आदर यामुळे आम्ही सर्वजणच भारावून गेलो.

आता ज्या कार्यक्रमासाठी गेलो होतो त्याची वेळ झालेली. आम्ही ग्रंथालयाच्या वरच्या मजल्यावर असलेल्या काशिनाथराव वैद्य सभागृहात गेलो. पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या माधवराव पटवर्धन सभागृहापेक्षा मोठं सभागृह. उपस्थिती? साधारण दोनशे लोक खुर्च्यांवर विराजमान झालेले! महाराष्ट्र साहित्य परिषदेत तीस-चाळीस लोकांचीही सांस्कृतिक कार्यक्रमाला यायची मारामार. इथं मात्र उत्स्फूर्तपणे इतकी मंडळी जमलेली.

विद्याताई देवधरांनी मला थेट व्यासपीठावर नेलं. माझा परिचय करून दिला आणि माईक माझ्यासमोर दिला. खरंतर मी पूर्णपणे भारावून गेलेलो. एक क्षण काय बोलावे असे वाटले आणि माझ्या तोंडून शब्द बाहेर पडले, ''साधारण साडेतीनशे वर्षापूर्वी छत्रपती शिवाजीराजांनी या परिसरात येऊन स्वराज्याचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला होता. महाराष्ट्रातल्या महाबळेश्वरच्या खोऱ्यातून येणारी कृष्णा नदी थेट श्रीशैल्यम्पर्यंत गेली आहे. त्यामुळे याच मराठी पाण्यावर इथली संस्कृती पोसली गेली आहे. आज आम्ही मोजकीच मंडळी इथं आलो आहोत. मराठी भाषेच्या संवर्धनाचा, जतनाचा विडा उचलून डॉ. विद्याताई देवधर यांच्यासारखी काही मंडळी इथं अहोरात्र काम करत आहेत. त्यांच्या पाठिशी आम्ही कायम उभे राहू! महाराष्ट्रात मराठी शाळा धडाधड बंद पडत आहेत. इंग्रजीचे थैमान माजलेय आणि तुम्ही इतके

पान ८ वर...

# आणि वाळलेले झाड पडले...



**दिल्लीतल्या** महाराष्ट्र सदनच्या आवारात एक झाड होतं. ते नेमकं अशा जागी होतं की त्यामुळे इमारतीत येणं अवघड व्हायचं. या झाडामुळे जागेला कुंपण घालता येत नव्हतं. झाड पाडलं तर कुंपण आणि प्रवेशद्वार अशा दोन्ही गोष्टी होणार होत्या पण नगरपालिका ते झाड पाडण्यास परवानगी देत नव्हती.

त्यावेळी शंकरराव चव्हाण गृहमंत्री होते. ते काही तरी करतील म्हणून पदाधिकारी त्यांच्याकडे गेले. शंकररावांनी, ''छे... छे... हे बेकायदेशीर काम आहे. झाड न पाडण्याचा नियम आहे, तो तोडता येणार नाही. नियम आहे त्याचे पालन झाले पाहिजे. झाड पाडता येणार नाही. मी यात मध्यस्थी करू शकत नाही. प्रवेशद्वार दुसरीकडे काढा'' असा सल्ला दिला.

पदाधिकाऱ्यांनी त्यांना नकाशे दाखवले जी दहाफुट चिंचोळी जागा आहे तिच्या मध्यावरच हे झाड आहे, हे पाडले तरच कुंपण आणि प्रवेशद्वार बांधता येईल; अन्यथा खूप गैरसोय होईल, हे शंकररावांना पटवण्याचा प्रयत्न केला; पण ते काही ऐकूनच घेईनात. बेकायदेशीर कामाला मी कधीही होकार देणार नाही असे ठणकावून सांगत त्यांनी पदाधिकाऱ्यांना मार्गी लावले.

त्या दिवशी शरद पवार नेमके दिल्लीत होते. जिथे गृहमंत्री काही करू शकत नाही तिथे दुसरं कुणी काही करील याची काहीच शक्यता नव्हती तरी पदाधिकारी पवार साहेबांकडे गेले, त्यांना त्यांनी सगळे सांगितले. नगरपालिका झाड पाडू देत नाही, त्यांचा तसा नियम आहे हेही त्यांनी पवारसाहेबांना सांगितले.

हे ऐकून पवारसाहेबही, ''अरे जर पालिकेचा नियम आहे तर झाड पाडता येणार नाही आणि मीही यात काही करू शकत नाही. उलट माझा सल्ला आहे की हे झाड पाडू नका, त्याला पार घाला, खतपाणी घालून वाढवा. झाड ही नैसर्गिक संपत्ती आहे तिचे जतन करा. मी सगळीकडे हेच सांगत असतो; पण लोक ऐकत नाहीत आमच्या बारामतीत तर काही लोक एकमेकांच्या बांधावरच्या झाडाच्या बुंध्यात मोरचुदाच्या पुड्या गाडतात. महिन्याभरात झाड मरते. मालकाला झाड का मेले, कुणी मारले ते जन्मात कळत नाही; पण त्यामुळे किती नुकसान होते हे लोकांना कळत नाही. ती अडाणी आहेत. आपण शिकलेली माणसं आहात तुम्ही झाड जपलं पाहिजे. हे सगळं मी तुम्हाला सांगायला पाहिजे का?'' असे सुनावून आलेल्यांना 'चा पानी' देवून कटवले.

पदाधिकाऱ्यांनी पवारसाहेबांचे बोल ध्यान देवून ऐकले होते. त्यांनी त्या झाडाला छानसा पार बांधला. त्याला ते रोज पाणी घालू लागले. अर्थात पुढच्या एक महिन्यात ते झाड आपोआप मेले. पदाधिकाऱ्यानी पालिकेला कळवले. पालिकेची गाडी आली आणि ते मेलेले झाड त्यांनी काढून टाकले. जागा साफसूफ करून दिली. पदाधिकाऱ्यांनी पवारसाहेबांच्या हस्ते भूमिपूजन करून कुंपणाची भिंत आणि प्रवेशद्वार बांधून काढले.

धन्य ते साहेब, आणि धन्य ते राजकारण...

महाराष्ट्र सदनाशी संबंधित अजून एका झाडाला साहेबांनी नुकत्याच मोरचुदाच्या पुड्या घातल्या आहेत. कुणाला काय पण त्या झाडाला पण कळले नाही आणि सरकारी गाडी आली आणि झाडाला घेऊन गेली. ■





# 'चपराक प्रकाशन'ची दर्जेदार ग्रंथसंपदा

**'चपराक प्रकाशन'कडून वैविध्यपूर्ण विषयांवर वाचनीय आणि दर्जेदार पुस्तके प्रकाशित केली जातात. आमच्या पुस्तकांना वाचकांकडून प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. याठिकाणी 'चपराक'च्या निवडक पुस्तकांची सूची देत आहोत.**

आमच्या www.chaprak.com या वेबसाईटवरून आपण ही पुस्तके ऑनलाईन पैसे भरूनही मागवू शकाल.


चपराक प्रकाशन शुक्रवार पेठ, पुणे २


**या पुस्तकांसाठी संपर्क : 'चपराक प्रकाशन', पुणे (०२०) २४४६०९०९/७०५७२९२०९२**













## वैचारिक / राजकीय
- कोंबडं झाकणाऱ्या म्हातारीची गोष्ट । **भाऊ तोरसेकर** । १५०
- ओविली फुले मोकळी । **सदानंद भणगे** । १५०
- भाषेचं मूळ । **संजय सोनवणी** । ११०
- दखलपात्र । **घनश्याम पाटील** । १५०
- झुळूक आणि झळा । **घनश्याम पाटील** । १५०
- थोडं मनातलं । **विनोद श्रा. पंचभाई** । १२०
- कवडसे । **स्वप्निल कुलकर्णी** । ११०
- स्वा.सावरकरांचा मानवधर्म । **सुधाकर द. जोशी** । १२०
- श्रीराम एक चिंतन । **नरहरी पत्तेवार** । ८०

## कथासंग्रह
- एमरल्ड ग्रीन । **समीर नेर्लेकर** । ७५
- सारांश कथा । **व्यंकटेश कल्याणकर** । ५०
- खुलजा सिम सिम । **सदानंद भणगे** । १००
- सत्यापितम् । **चंद्रलेखा बेलसरे** । १३०
- गजरा । **दत्तात्रय वायचळ** । १००

## कादंबरी
- कॉलेज गेट । **सागर कळसाईत** । २४९
- मोरूनामा । **विजय तरवडे** । १००
- हरजीबुवाच्या नावानं **उमेश सणस** । १५०
- टर्मिनस व्हिक्टोरिया । **रमेश गोविंद वैद्य** । १२०
- दगडखाणीतील उद्ध्वस्त आयुष्य । **हणमंत कुराडे** । ७५
- बस नंबर बेचाळीस । **सुभाष कुदळे** । १००

## बालसाहित्य
- गढीचं गूढ । **सुभाषचंद्र वैष्णव** । ४०
- चार शिलेदार । **सुभाष कुदळे** । ६०
- नवलकथा । **सुभाष कुदळे** । ४०
- मुलांच्या मनातलं । **विनोद श्रा. पंचभाई** । ७५

## चरित्र / आत्मचरित्र
- बाळासाहेब एक अंगार । **नागेश शेवाळकर** । १७५
- लोकनायक सयाजीराव गायकवाड । **चंद्रलेखा बेलसरे** । ७०
- गंध माणसांचा । **संजय वाघ** । १३०
- आपले राष्ट्रसंत । **विनोद श्रा. पंचभाई** । ६०
- एकनाथजी रानडे । **सागर सुरवसे** । ७५
- चौथा स्तंभ । **सुभाष धुमे** । १००
- शांतिदूत लालबहादूर शास्त्री । **प्रभाकर तुंगार** । ५०

## आणि इतर
- विज्ञानमूर्ती ज्ञानोबा तुकोबा (आध्यात्म) । **दत्तात्रेय गायकवाड** । १३०
- वाट इतकी सरळ (मर्माक्षरी संग्रह) । **श्रीराम पचिंद्रे** । ५०
- तपोभूमी नाशिक । **रमेश पडवळ** । २३०
- पाषाणगंध (नाटक) । **सदानंद भणगे** । ५०
- हसण्यावर टॅक्स नाही (हास्यचित्रे) । **समीर नेर्लेकर** । ६०

# रद्दीत गवसलेले 'महानाट्य'




उपेक्षित पुस्तकांचे जग

भारत सासणे, पुणे
९४२२०७३८३३

**'काळ्या** शुक्रवारा'बद्दल मी ऐकून होतो, पण त्याबाबतचा वृत्तांत मी असाच, रद्दीतल्या दुर्लक्षित पुस्तकातून मिळवला. १९ मे १७८०, वेळ सकाळ. स्थळ अमेरिकेतला 'न्यू इंग्लंड' हा परगणा. सकाळी दहाच्या सुमारास गर्द अंधार न्यू इंग्लंडवर पसरला. हा अंधार वाढत राहिला आणि मेणबत्त्या पेटवाव्या लागल्या. शाळा, कारखाने बंद झाले. हाहाकार माजला. चर्चमध्ये जमून प्रार्थना म्हटल्या जाऊ लागल्या. 'परमेश्वरी कोपाचा दिवस' म्हणून धर्मोपदेशकांनी या दिवसाबद्दल सांगितलं.

मेन प्रांत, न्यू हँपशायर, मॅसाच्युसेटस, ऱ्होड आयलंड आणि कनेक्टिकर या प्रांतावरही हा अंधार पसरला. न्यूयॉर्कचा पूर्व भाग आणि पेन्सिल्व्हानियाचा ईशान्य भागसुद्धा अंधाराखाली होता. चार वाजता अंधार गडद झाला आणि हिरवट प्रकाशाची आभा अनेकांनी अनुभवली; पण हा दिलासाही नाहीसा झाला. अंधार वाढत राहिला. रात्री पौर्णिमेचा चंद्र दिसायला पाहिजे होता; पण तोही दिसला नाही. रात्री एक वाजता मात्र, तांबडा चंद्र आकाशाच्या मध्यावर दिसला. पहाटे मात्र सूर्य उगवला. चौदा तासांचं अंधाराचं साम्राज्य संपलं. जल्लोश झाला. हा 'काळा शुक्रवार' म्हणून नोंदवला गेला आहे. विज्ञानाला न सुटलेलं कोडं किंवा सुरस विज्ञानिका म्हणून याकडे पाहिलं गेलं असेल. मी मात्र सतराव्या शतकातील मानसिकता पाहतो आहे. नक्कीच या 'महानाट्यावर' कोणी काही कादंबरी इत्यादी लिहिली असेल. मला तरी अजून त्या घटनेवरची




लिहिलेली कृती हाती लागलेली नाही; पण रद्दीत या ऐतिहासिक महानाट्याचा वृत्तांत सापडला. सैरावैरा धावणाऱ्या लोकांचे जथ्थे दिसले. भय दिसलं. उपेक्षित-दुर्लक्षित पुस्तकातून हे भयनाट्य दिसलं.

पुरोहित स्वामींच्या मूळ पुस्तकाचं नाव 'ॲन इंडियन मंक' असं आहे. सन एकोणीससे बत्तीसमध्ये या पुस्तकाची जुळवाजुळव झाली आहे. पुढे, मराठीत याचा अनुवाद उपलब्ध झाला आहे. या पुस्तकाला सांप्रदायिक महत्त्व असेलच. म्हणून सांप्रदायिक श्रद्धाळूंनी ते वाचलं असणार. इतरांनी ते पुस्तक आवर्जून वाचावं असं काही कारण नाही. म्हणून मूळ पुस्तक दुर्लक्षित राहिलं आहे; पण या पुस्तकाला कवी यीटस्‌ची प्रस्तावना आहे. 'गीतांजली' नंतर वीस वर्षांनी आपल्याला पुन्हा प्रस्तावना लिहिण्याचा योग आला आणि हे पुस्तक तितकंच महत्त्वाचं आणि योग्यतेचं आहे असं कवी यीटस्‌ म्हणतात.


साधना काळात पुरोहित स्वामी भटकंती करीत माहूरला पोहचले. माहूरला दिनक्रमानुसार दत्तशयन आहे. या तरूण साधकाने मंदीरात रात्री थांबून खात्री करण्याचे ठरविले. पुजाऱ्याने त्याला परवानगी दिली आणि कुलूप लावून तो निघून गेला. तरूण साधक मंदीरात, दत्तशय्येच्या बाहेर एकटाच आणि जागा. रात्री दीड वाजता सुगंध आणि पादुकांचे आवाज. जणू कोणी येत आहे. साधकाचे सर्वांगाचे केस भीतीने उभे राहिले. रात्रभर कुणी कूस बदलत आहे अशी चाहूल. पुन्हा पहाटे कुणी निघून जातंय असा पावलांचा आवाज. दुसऱ्या दिवशी साधक फुलांनी शय्या सजवतो आणि शाल ठेवतो. दुसऱ्या दिवशी, फुलं आणि शाल विस्कटलेली सापडते. साधक आणि पुजारी आनंदित होतात.

कवी यीटस्‌ यांनी प्रस्तावनेत या प्रसंगाबद्दल लिहिताना आपण त्या अनोख्या विश्वात डोकावू शकलो आणि प्रत्यक्षानुभवाची आपली इच्छा-भूक भागली असं म्हटलं आहे.

स्वामींनी सांगितलेली हकीकत खरी की खोटी हा प्रश्न इथे महत्त्वाचा नसतो. सांगितलेली हकीकत अप्रमाणिक, असं म्हणून आपण स्वत:ची सुटका करून घेऊ शकतो; पण इथे मुद्दा अज्ञेयात, किंवा अनोख्या जगात डोकावण्याच्या संधीचा आहे. पुन्हा, मी या तरूण साधकाची मानसिकता पाहतो. एकाकी भ्रमंती करणारा साधक चिकित्सक बुद्धी जागृत ठेवतो आहे. श्रद्धेपेक्षा त्याला प्रयोग महत्त्वाचा वाटतो. त्याला जे पाहायचं आहे तेच त्याला दिसतं आहे आणि तत्कालीन समाजमानस शास्त्राबद्दलही थोडं आपल्याला समजतं आहे. अविश्वसनीय म्हणून मी ही हकीकत बाजूला सारत नाही. तत्पूर्वीच मी थांबतो. हे थांबणं महत्त्वाचं-कवीच्या भाषेत, 'थांबणे अघोरी कला!' ■

# जोपासना

**माणसाला** झाडे लावायची उपजत आवड असते. शहरात राहत असूनही आपण हौसेने एखादे झाड तरी लावतोच. घराच्या आजूबाजूला जर तशी योग्य जागा असेल तर अनेक प्रकारची रोपटी लावून त्याची देखभाल करण्याची हौस कित्येकांना असते. जरी फ्लॅटमधे राहत असले तरी शक्य असेल तेथे, खिडकीत, बाल्कनीत, टेरेसवर अगदी जेथे कुठे शक्य असेल तेथे लोकांकडून अशी झाडे लावायची हौस वा छंद जोपासला जातो. काहीजण 'इनडोर प्लांट' लावूनही हा आनंद घेतात. अशी हौसेने लावलेली फुलझाडे व शोभेची झाडे घरातले वातावरण प्रसन्न ठेवायला नक्कीच मदत करतात. अशा झाडांची कणाकणाने होणारी वाढ, रोपट्याला आलेले पहिलेवहिले फुल, त्याचा रंग, सुवास याचे कोण कौतुक असते.



हे सगळे क्षण अगदी नकळत आपण साजरे करत असतो! अगदी क्षणभर का होईना पण अशा गोष्टी माणसाला आनंद देवून जातात!

इथपर्यंत ठीक आहे, पण अशी कुंडीत किंवा परसात लावलेली शोभेची वा फुलझाडे कशी व किती वाढायला हवीत, पानांचा रंग कसा हवा, त्यांची फुले कधी यायला हवीत याबद्दल आपण काही आडाखे बांधतो. या झाडांकडून अनैसर्गिक अपेक्षा करतो. त्याची वाढ सरळच व्हायला हवी, त्याची फांदी विशिष्ट दिशेलाच वाढायला हवी किंवा त्यांच्या फुलांचा रंग अमक्या प्रकारचाच हवा इत्यादी इत्यादी. 'हे झाड मी लावले आहे, मी त्याची देखभाल करतो आहे, म्हणजे त्याचा आकार त्याची फुले हे सर्व माझ्या अपेक्षेप्रमाणेच व्हायला हवे आणि जर तसे घडले नाही तर मी त्याला छाटून हवा तो आकार देणार, मला हवीत तशी फुले नाही आली तर ते झाड मी उपटून काढणार' हा अट्टहास चुकीचा आहे, असे मला वाटते! तुम्ही झाड लावले, त्याला खतपाणी घातले, देखभाल केली म्हणून त्या झाडाने तुमच्या अपेक्षा पूर्ण करायलाच हव्यात हा विचार चुकीचा आहे. तुम्ही तुमचे काम केले. त्यातून हवा तेवढा आनंदही तुम्हाला मिळाला आहे. तेव्हा आता त्या रोपाने कसे व कधी बहरावे, त्याला फुल कधी यावे, त्या फुलाचा रंग कसा असावा हे निसर्गाला ठरवू दे ना! तुम्ही तुमच्या अपेक्षा त्याच्यावर कशाला लादताय? नैसर्गिकरीत्या बहरलेल्या त्या सौंदर्याचा आनंद लूटा!

जे तत्त्व अशा झाडाबद्दल तेच माणसामधल्या नात्यांच्या बाबतीतही लागू आहे. तुम्ही कोणत्याही अपेक्षेशिवाय नात्यांची जोपासना करत रहा. अशी नाती मग नैसर्गिकरीत्या बहरतील, फुलतील आणि अशा फुललेल्या नात्यातून मिळेल तोच खरा स्वर्गीय आनंद! तुम्हाला काय वाटते?

■ **प्रल्हाद दुधाळ**, पुणे
९४२३०१२०२०

## मराठी लेखकांना आवाहन!

नमस्कार मित्रांनो!

'चपराक'चा वाचकवर्ग अल्पावधीतच सर्वदूर निर्माण झाला आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात जसे 'चपराक'चे सभासद आहेत, तसेच महाराष्ट्राबाहेरील मराठी वाचकांचाही आम्हाला भरभरून प्रतिसाद मिळत आहे. 'वाचनसंस्कृती कमी होतेय' अशा खोट्या अफवा पसरविणाऱ्यांना आम्ही प्रत्यक्ष कृतीतून 'चपराक' दिली आहे.

वैविध्यपूर्ण विषयांवरील वाचनीय आणि दर्जेदार मजकूर दिल्याने 'चपराक'ची दखल सर्वत्र घेतली जातेय.

आबालवृद्धांना हवाहवासा वाटेल असा अंक देण्याचा आमचा कयास असतो. सध्या लिखाणासाठी व्यासपीठ मिळत नाही, असाही सूर काहीजण लावतात. दर्जेदार लिहिण्याची ऊर्मी असणाऱ्यांसाठी 'चपराक' हे हक्काचे व्यासपीठ आहे. लिखाणाचा दर्जा हा एकमेव निकष असल्याने गुणात्मक साहित्याचे आमच्याकडे कायम स्वागत आहे.

कथा, कविता, लेख, चालू घडामोडीवरील आपली मते 'चपराक'कडे आवर्जून पाठवा. तसेच आपण साप्ताहिक 'चपराक' आणि 'साहित्य चपराक' मासिकाचे सभासदही अवश्य व्हा! तुम्ही सभासद असाल तर तुमच्या मित्रमंडळींना, नातेवाईकांना, वाचनाची आवड असणाऱ्या प्रत्येकाला आवर्जून सभासद करून घ्या!

***अंकाची वार्षिक वर्गणी (सर्व विशेषांकासह)***

**साप्ताहिकासाठी फक्त २०० रू.**

**मासिकासाठी फक्त ५०० रू.**

संपर्क : **'चपराक प्रकाशन'**
साईकृपा अपार्टमेंट, पहिला मजला, ६१७, शुक्रवार पेठ,
शाहू गणपतीसमोर, शिवाजी रस्ता, पुणे ४११ ००२ ,
दूरध्वनी : ०२०-२४४६०९०९, ७०५७२ ९२०९२
ईमेलः info@chaprak.com बेवसाईटः www.chaprak.com

# आविष्कार स्वातंत्र्याची बाजारबसवी

**युपीए** कारकिर्दीत हेलिकॉप्टर खरेदीत संरक्षण मंत्रालयात झालेल्या घोटाळ्याचा सध्या पर्दाफाश होत आहे. पण मजेची गोष्ट अशी की, ह्या घोटाळ्याचा गाजावाजा आज झालेला नाही. युपीए सत्तेत असताना, हा व्यवहार चालू असतानाच भारतातील एकच वृत्तवाहिनी त्यावर झोड उठवत होती. बाकीचे तमाम नामवंत संपादक, पत्रकार त्याबाबतीत मौन धारण करून होते. म्हणजेच तेव्हाच ज्यांनी अशा भानगडीचा पर्दाफाश करायचा, तेच गुपचुप त्या घोटाळ्यावर पांघरूण घालत होते. ज्या 'टाईम्स नाऊ' या एकमेव वाहिनीने त्यावर झोड उठवली होती, तिला हेलिकॉप्टर विक्रेता कंपनीने बदनामी केल्याबद्दल कोर्टात खेचण्याची धमकीही तेव्हा दिलेली होती. प्रत्यक्षात तसे काही झाले नाही. उलट आता इटालीच्या कोर्टात त्याच कंपनीच्या अनेकांना दोषी ठरवले गेले आहे आणि अनेक भारतीय नेत्यांची नावे भ्रष्ट व लाचखावू म्हणून चव्हाट्यावर आलेली आहेत. पण त्याच निमित्ताने झालेल्या चौकशी व तपासात भारतीय पत्रकारितेचे बाजारबसवीचे हिडीस रुपही जगासमोर आलेले आहे. कोपऱ्यावर उभे राहून देशविक्र्याचा धंदा करणाऱ्या कुणा व्याभिचारी वेश्येपेक्षा भारतातले अनेक नामवंत पत्रकार किंचीतही वेगळे नाहीत. याचाही पर्दाफाश या निमित्ताने पुन्हा एकदा झाला आहे कारण याच कागदपत्रांनी वीस नामवंत भारतीय पत्रकारांना दरमहा दोन कोटी रुपयांची किंमत मोजून पापावर पांघरूण घालण्यास भाग पाडण्यात आल्याचे दस्तावेज समोर आले आहेत. कोण आहेत हे पत्रकार आणि त्यांनी किती किंमतीत आपले आविष्कार स्वातंत्र्य बाजारात विकून टाकले? त्यांची नावे समोर आलेली नाहीत. पण त्यांचे चेहरे आपण ओळखू शकत नाही, असे अजिबात नाही. आजही ह्या भानगडीवर प्रकाश टाकण्यात ज्यांनी कंजुषी चालविली आहे, तेच खाल्या मिठाला जागणारे नसतील काय? महिनाभरापुर्वी फरारी विजय मल्ल्या काय बोलला होता आठवते?

'आपण तेजीत असताना अनेक माध्यमसमूह व त्यातील पत्रकारांना ऐष, चैन, मौज करायला सुविधा व साधने पुरवली आहेत, हे विसरू नका. आज केवळ टीआरपी हवी म्हणून मला बदनाम करू नका', असा ट्वीट मल्ल्याने कोणासाठी केला होता? आपल्यापाशी अशा पत्रकारांनी केलेल्या मौजमजेचे पुरावेही आहेत, अशी धमकी मल्ल्याने दिलेली होती.




तशीच काहीशी धमकी ऑगस्टा वेस्टलॅन्ड कंपनीने पोसलेल्या पत्रकार वाहिन्यांना दिली आहे काय? नसेल तर काही अपवाद वगळता, बाकी माध्यमे अशी चिडीचूप कशाला आहेत? आपणच गुजरात वा अन्य भानगडी शोधून काढल्या, म्हणून सतत मिरवणारे आणि मोदींना शेकडो प्रश्न विचारून भंडावून सोडणारे पत्रकार, आज हेलिकॉप्टर प्रकरणात असे मौनीबाबा कशाला झाले आहेत? त्यांनी चेहरे लपवले म्हणून सत्यापासून सुटका असते काय? चारपाच वर्षापुर्वी अनेक घोटाळे समोर येऊ लागले, तेव्हा गाजलेले एक नीरा राडीया नावाचे प्रकरण होते. ही बाई अनेक पत्रकारांना खिशात टाकून राजकीय सौदेबाजी करीत होती आणि तिचे दलाल म्हणून हे नामवंत पत्रकार सौदेबाजीत पुढाकार घेत लोकमत बनवण्याचे उद्योग करीत होते. त्यात प्रभू चावला,



भाऊ तोरसेकर
९७०२१३४६२४

बरखा दत्त आणि वीर संघवी अशी नावे पुढे आलेली होती. अजूनही ही माणसे पत्रकार म्हणून मिरवत असतात. त्यांनी कधी आपल्या पापाची कबुली दिली आहे काय? वीर संघवी याने आपल्या लिखाणातून पाप झाल्याची निदान कबुली दिली पण बरखा बेशरमपणे आजही पत्रकार म्हणून मिरवते आहे. पाकिस्तानी हेरखात्याच्या संस्थेने योजलेल्या विविध सम ारंभाला अगत्याने हजेरी लावून चैन करणाऱ्या पत्रकारांचे चेहरे आपल्याला ठाऊक नाहीत काय? मग ऑगस्टा वेस्टलॅन्ड कंपनीकडून पैसे घेऊन देशाची फसवणूक करणाऱ्यात कुठले पत्रकार विकले गेले असतील, याची वेगळी यादी द्यायला हवी काय?

खरे तर मागल्या दहापंधरा वर्षात माध्यमांचा इतका प्रचंड विस्तार झाला, त्यामध्ये आलेली गुंतवणूक कुठून आली व त्यांचे बोलविते धनी कोण आहेत, त्याचा तपास कुठल्या तरी खास उच्चपदस्थ पथकाकडून होण्याची गरज आहे. विविध मंचावर आविष्कार स्वातंत्र्याचे झेंडे घेऊन मिरवणाऱ्या पत्रकार संपादकांच्या व्यक्तिगत मालमत्ता व संपत्तीची झाडाझडती होण्याची गरज आहे. अनेकजण दोन दशकांपुर्वी कुठल्या तरी वर्तमानपत्र वा वाहिनीमध्ये सामान्य पत्रकार होते. त्यातल्या कित्येकांनी आजकाल आपल्या मालकीचे माध्यमसमूह उभे केले आहेत. त्यांची खरी मालकी व गुंतवणूक कुठून आली, त्याचाही तपास आवश्यक आहे. कारण यातल्या बहुतेकांनी दहापंधरा वर्षात राजकीय सुपारीबाजी करीत शार्पशूटर होऊन अनेक राजकीय बळी घेतले आहेत. अनेक राजकारण्यांचा गेम केला आहे. किंवा दुसरीकडे जे काही भ्रष्टाचार वा राजकीय गुन्हे झाले, त्यात सहभागी होऊन आपापला हिस्सा उचललेला आहे. म्हणूनच अशा पत्रकार संपादकांचे खरे चेहरे जगासमोर येण्याची गरज आहे. दिल्लीत अशा अनेकांनी आपापल्या मालमत्ता कशाच्या बळावर उभ्या केल्या आणि त्यांच्याकडे इतका पैसा, श्रीमंती कुठून आली ते शोधण्यासारखे आहे. कारण याच लोकांनी पत्रकारिता चक्क ब्लॅकमेलिंगचा धंदा करून टाकला आहे. पीटर मुखर्जी व इंद्राणी मुखर्जी हे त्याचे ज्वलंत उदाहरण आहे. सोनिया गांधी यांनी १९९८ च्या लोकसभा निवडणुकीत अकस्मात प्रचारसभा घ्यायला सुरूवात केली आणि नंतर त्या थेट राजकारणात उतरल्या. नेमका तोच मुहूर्त साधून देशात वृत्तवाहिन्यांची सुरुवात झाली. तो योगायोग होता काय? स्टार नेटवर्क नावाच्या परदेशी कंपनीने अकस्मात भारतामध्ये वृत्तवाहिनी सुरू केली आणि त्याचे सर्वकाम एनडीटीव्ही या समुहाकडे सोपवले. तिथून उदयास आलेल्या तमाम नामवंत पत्रकारांची झाडाझडती आवश्यक आहे.

सोनिया राजकारणात उतरल्या आणि वृत्तवाहिन्यांचा जमाना सुरू झाला. तिथपासूनच राजकारणी व पत्रकार यांच्यातल्या संगनमताचा प्रकार वाढत गेला. पत्रकारितेला बाजारबसवी करण्याचे यशस्वी कारस्थान त्यात शिजवले गेले. मग कधी पत्रकार त्या मोहाला बळी पडत उद्योगसमूह किंवा काळ्या पैशाच्या जनानखान्यात जाऊन पडले त्याचा थांग लागला नाही. आता तर काळ्या पैशाखेरीज वर्तमानपत्रे चालू शकत नाही, अशी दुर्दशा झाली आहे. पत्रकारितेने विश्वासार्हता पुर्णपणे गमावली आहे. त्यामुळेच जनतेच्या माथी ज्या गोष्टी मारायच्या आहेत, त्याचा उद्योग तोट्यात चालवावा लागतो. तो चालवायचा तर कुणीतरी त्यात काळा पैसा ओतावा लागतो. त्यासाठी त्याचे हितसंबंध जपावे लागतात आणि पत्रकाराला त्याच धन्याची रखेली म्हणून मिरवावे लागते. ही वास्तविकता झालेली आहे. एकदा पातिव्रत्याला तिलांजली दिली, मग अब्रु नावाचा प्रकार शिल्लक उरत नाही आणि अधिकाधिक बोली लावणाऱ्याशी शय्यासोबत करण्यात काही गैर उरत नाही. तेच झाल्यावर पैसे मोजणारा देशातला आहे की परदेशी आहे, त्याचे भान कोणी ठेवायचे? देशहित, समाजहित ही दिखावू व्रतवैकल्ये होऊन जातात. जगासमोर वटसावित्रीच्या व्रताचे नाटक रंगवायचे आणि अंधारले मग नाक्यावर येऊन व्याभिचाराचा धिंगाणा घालायचा. मागल्या दोनचार दिवसात ऑगस्टा वेस्टलॅन्ड प्रकरण गाजत असताना अनेक इंग्रजी प्रतिष्ठीत वाहिन्यांचे मौन स्पष्ट आहे. ज्यांनी इटालीच्या कन्येवर 'बहू' म्हणून विश्वास ठेवायचे प्रवचन मागली पंधरा वर्षे देशाच्या जनतेला ऐकवले, त्यांनाच आता इटालीयन न्यायाबद्दल शंका वाटत आहेत. ज्या देशातील न्यायावर विश्वास ठेवू नये, त्या देशाच्या कन्येवर कशाला विश्वास ठेवायचा? कोणापाशी त्याचे उत्तर आहे काय? वेश्यातरी आपल्या व्यापारधंद्याशी यापेक्षा प्रामाणिक असतात. पत्रकारिता आता त्यापेक्षाही रसातळाला गेली आहे. ■

## 'चपराक प्रकाशन'चे रसिकप्रिय कवितासंग्रह!..

- **नवं तांबडं फुटेल** । माधव गिर
- **माझी कविता** । सरिता कमळापूरकर
- **आर्यमा** । चंद्रलेखा बेलसरे
- **सुंबरान** । प्रभाकर चव्हाण
- **उभारी** । मेघा टिळेकर
- **सजवलेले क्षण** । प्रल्हाद दुधाळ
- **अस्तित्व** । शांताराम डफळ
- **अनुभूती** । चंद्रलेखा बेलसरे
- **जिजाऊंची निष्ठा** । मेघा टिळेकर
- **काव्यलहरी** । शकुंतला देव
- **रे मना** । मनिषा वाणी
- **तवंग** । शांताराम हिवराळे
- **दाटून येताहे काळोखी काहूर** । शांताराम हिवराळे
- **नाती अशी, जपायची कशी**। सम्राट नाईक
- **अक्षरगाणी** । संदिपान पवार
- **अंधारडोह** । शांताराम हिवराळे
- **नाते मनाशी मनाचे** । रमेश जाधव
- **तरी आम्ही मतदारराजे** । विश्वास वसेकर

या कवितासंग्रहासाठी संपर्क : 'चपराक प्रकाशन', पुणे (०२०) २४४६०९०९/७०५७२९२०९२

काव्यपुष्प



## पाण्याची लावणी

काय कामाची राया
तुमच्या खिशातली नोट
पाणी द्या, पाणी द्या
द्या पाणी दोन घोट...

अहो दाजी द्या ना
हिला
पाणी दोन घोट...

गोड वाटना चांदणं
गोड वाटना अलिंगन
भरले मन, भरले पोट,
तरी कोरडे ओठ
अन् राया मला....
अहो दाजी हिला...
पाजा की पाणी दोन घोट

गाडी तुमची लाखाची
ऐट तुमची मोलाची
सांगा काय कामाची
तहान भागना माझी
बोलता मोठं मोठं
राया मला पाणी द्या की
दोन घोट..
खरच दाजी हिला
पाणी पाजा ना दोन घोट



◆ सौ. शैलजा कारंडे-नागिमे
लातूर
९८२३६६५०९६

## गुंता

खेळलाच नाही जुगार
तरी कसा हरलो
केलाच नाही गुन्हा
तरी कसा अडकलो
केलाच नाही गुंता
तरी कसा गुंतलो
केलाच नाही पाण्याशी संग
तरी भोवऱ्यात कसा फसलो
घेतल्याच नाही अंगावर पावसाच्या सरी
तरी कसा भिजलो
या साऱ्यांचे उत्तर शोधण्याच्या नादात
मी माझे अस्तित्वच विसरलो

◆ रमेश जाधव
एम - २६/२२७२ म. हौ. बोर्ड
येरवडा , पुणे- ४११००६
९८५००५६२१२



## तळे

वर्तुळामागून वर्तुळे
विचारांची वर्तुळे
मन माझे आहे जणू
खोल खोल खोल तळे

विचारांची असते गर्दी
पुढचा विचार देतो वर्दी
जुने विचार जाती तळाशी
नवे विचार, नव्या किर्दी

शांत शांत जलाशयात
कुणी फेकतो एक खडा
निर्मळ, स्वच्छ मनालाही
जातो जेव्हा मोठा तडा

◆ उदय भयवाळ
१९, शांतीनाथ हौसिंग सोसायटी,
गादिया विहार शेख,
शहानूरवाडी, औरंगाबाद ४३१००५
८८८८९२५४८८

## माहेर अंगण

माहेर अंगण
स्वच्छंदी जीवन
सखी सहवास
रम्य भासे

षोडश वयात
मोहरते अंग
नयनात स्वप्न
फुलतसे

ओलांडून माप
घरीदारी वावर
गोकुळ फुलले
हर्षोल्हासे

आयुष्य संधीकाल
सहवासी साजण
आश्वस्त जीवन
धन्य भासे

◆ स्मिता देशपांडे
९६३७९९१४७८



## जावे आभाळाचे गाणे रुजून

निळ्याशार आभाळात
पाखरू होऊन उडावे
पंख पसरून आपले
आभाळाचे गाणे गावे

शब्दांनी सांडून द्यावी
आभाळाची प्रीती
उरातील ठोक्यांनी करावी
तारे-ताराकांशी संगती

इवल्या इवल्या पंखांनी
इंद्रधनुशी बागडावे
शब्दांची जुळवाजुळव करून
झोका घेत झुलावे



कधी द्यावी शब्दांनी
शब्दांनाच हूल
कधी पाझरावी अशी
काल रातीतील भूल

प्रीतीच्या लपंडावात
यावे आभाळ भरून
तुझ्या माझ्या हृदयात
जावे आभाळाचे गाणे रुजून

◆ शानिल चंद्रकांत पाटील
मु. मोहोट्याचापाडा, पो. उचाट,
ता. वाडा, जि. पालघर ४२१३१२
८९७५०७६४५६/९९६००८७७९५

**कविता पाठवा**

**साप्ताहिक 'चपराक'साठी आपल्या स्वरचित कविता अवश्य पाठवाव्यात.**
**योग्य त्या कविता अंकातून प्रकाशित केल्या जातील.**
**कविता पाठविण्यासाठी पत्ता :** 'चपराक प्रकाशन', ६१७, साईकृपा अपार्टमेंट, शाहू गणपतीसमोर, शिवाजी रस्ता, शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२
ईमेल : kavyapushp3@gmail.com

# उपकार



**पहाटे** फिरायला चाललो असताना दोन वृद्ध गृहस्थ चालले होते. त्यातील एकाचं बोलणं ऐकून मी थिजलो... शहारलो. तो दुसऱ्याला सांगत होता... ''माझा मुलगा मला म्हणाला... तुम्ही आम्हाला जन्म दिला म्हणजे उपकार नाही केला... नीट रहायचं असेल तर रहा...'' वृद्धाच्या डोळ्यात पाणी आलं असावं... पुढचं ऐकण्याचं धाडस माझ्या अंगी नव्हतं... प्रत्यक्ष मुलगा बापाला उपकाराची भाषा वापरत होता...

खरंच आपण जगतो म्हणजे काय आईबापावर उपकार करतो? काय, कशासाठी त्यांनी पोटाला चिमटा घेऊन, वेळप्रसंगी उपाशी राहून आपल्याला शिकवायचं... मोठं करायचं?... आम्हाला वाटतं आम्हीच सगळ्यांवर उपकार करतो आहोत. एखाद्या हुशार मुलाला कुठं नोकरी मिळाली तर त्याचे श्रेय घेणारे बरेच असतात. जणू त्यांनी उपकार करून, मेहरबानी दाखवून, स्वतःच वजन खर्च करून त्याला नोकरी दिलेली असते.

खरं तर माता पित्यांनी आपल्याला जन्म दिला हेच त्यांचे आपल्यावर अनंत उपकार आहेत. चार भिंतीच्या संरक्षक घरात ठेवून त्यांची सगळ्या जगाशी लढण्याची ताकद आपल्याला मिळवून दिलेली असते. नाटकी, फसव्या जगात कसं वागावं ह्याचं शिक्षण त्यांनीच दिलेले असते आणि त्यांच्या म्हातारपणी त्यांना सांभाळणे म्हणजे उपकार नाहीत तर ते कर्तव्य असते.

काही माणसं पहिल्यापासूनच गर्विष्ठ असतात. त्यांना प्रत्येक गोष्ट उपकार केल्यासारखी वाटते. गरिबांना मदत करणे, जनावरांना खायला देणे, मित्रांना पार्टी देणे यासारख्या गोष्टी ते उपकार केल्यासारख्या करतात. त्याचा त्यांना तोटा होतो. उपकाराची भाषा आपुलकीच्या नात्यात नसते. गुरू त्याच्या शिष्याला शिकवण देतो ते उपकार म्हणून नाही. आई मुलांचे संगोपन करते, त्यांना वाढवते, चांगलं शिक्षण देते ते उपकार म्हणून नाही. त्यात माया असते, प्रेम असते, ममत्व असते. द्रौपदीने श्रीकृष्णाच्या बोटाला कापल्यानंतर स्वतःचा शालू फाडून पट्टी बांधली ती काही तो राजा आहे, त्याला उंची पट्टी बांधायला पाहिजे अशा उपकाराच्या भावनेने नाही तर त्याला लागता क्षणी तिला काही सुचलंच नाही. तिनं क्षणाचाही विचार न करता शालू फाडला.



शब्दतरंग

सदानंद भणगे, नगर
९८९०६२५८८०

आजकाल लोक मात्र साहेबाच्या मुलाच्या लग्नाला जाताना भारीपैकी प्रेझेंट (वेळ पडल्यास कर्ज घेऊन) घेऊन जातात, तर शिपायाच्या मुलाच्या लग्नाला जाताना त्याच्या हातावर अकरा रूपये ठेवतात... (जेवतात मात्र दोन्हीकडे व्यवस्थित...) जिथं फायदा असतो तिथं लोक जातात. अशा लोकांना आम्ही 'सूर्यफूल' म्हणतो. सूर्यफूलाचं तोंड जसं सदोदीत सूर्याकडे असतं; तर ह्याचं लक्ष नेहमी फायद्याकडे असतं. 'गरज सरो वैद्य मरो' ही वृत्ती कायमच...

साहेबही अशा प्रसंगी उपकार केल्यासारखे ते भारी प्रेझेंट ठेवून घेतात. तोंडाने मात्र... 'कशाला कशाला –एवढ्या महागाचं...' असं म्हणत असतात आणि वस्तू स्वीकारत असतात. शिपाई मात्र साहेबाने दिलेले अकरा रूपये देवाचा प्रसाद मिळावा तसा स्वीकारतो. त्यावेळी देणाऱ्याला वाटत असतं मी त्याच्यावर उपकार करतोय.

आपण ज्या पृथ्वीवर राहतो त्या पृथ्वीचे आपल्यावर उपकार आहेत. ज्या जमिनीवर आपण पाय ठेवतो तिचे आपल्यावर उपकार आहेत. (पाय जमिनीवरच ठेवा असा अनाहूत सल्लाही ती भूमी देते.) ज्या संस्थेत आपण शिकतो, ज्या संस्थेत आपण काम करतो त्या संस्थेचे आपल्यावर उपकार असतात आणि ह्या सगळ्यांचे उपकार आपल्याला फेडायचे असतात, कष्ट करून, परतफेड करून... कुणाला न सांगता...

उपकाराची फेड उपकाराने करणे ह्याला माणुसकी म्हणतात. उपकारांची फेड अपकाराने करणं ह्याला कृतघ्नपणा म्हणतात. तुमच्या वागण्यामुळे जग तुम्हाला ओळखत असतं. बळजबरीने उपकार करून मोठं होता येत नसतं आणि उपकाराची फेड जाणीव न करून देता करणं ह्याला मोठेपणा म्हणतात. ■

# वाङ्मयचौर्य

**दूरदर्शनवर** बातम्या सारख्या झळकत होत्या. सुप्रसिद्ध अभिनेते व डान्स कोरीओग्राफर यांना गंडवले. सराफाच्या सोन्यावर डल्ला मारला. अशा फसवणुकीच्या बातम्या आपण रोजच वाचतो. अशा बातम्यांवर प्रकाशझोतही असतो. चोरी, दरोडा, फसवणूक याबाबतची बातमी नाही, असा एकही दिवस नसतो. अशा बातम्या चर्चिल्यासुद्धा जातात. काही चोऱ्या अशा असतात की, त्या फार उशीरा उघडकीस येतात पण ही चोरी सर्वांनाच माहीत पडतेच असे नाही.



आमचे एक साहित्यिक स्नेही आहेत. त्यांनी काही कालावधी पूर्वी वॉट्सअ‍ॅपवर एक घटना टाकली. त्यांनी लिहिलेली एक कविता एका लहान मुलीने तिच्या नावाने एका स्पर्धेला पाठवली आणि त्या कवितेला प्रथम पारितोषिक मिळाले. पारितोषिक जाहीर झाल्यानेच आम च्या स्नेह्यांना ही बाब कळाली आणि प्रथम पुरस्काराची कविता म्हणूनही छापली होती. त्या लहान मुलीवर काय कारवाई करायची यावर उहापोह झाला, पण तिच्या बालमनावर काही परिणाम होऊ नये म्हणून तिला समज द्यावी... जाणीव करुन द्यावी असे वाटल्याने त्यांनी ही घटना सोडून दिली... हे झालं लहान मुलीच्या बाबतीत. समजा अजाणतेपणामुळे तिच्या हातून हे घडलं, पण कळती, सुशिक्षित माणसंही असं करू लागली तर? या विचाराने मला एक घटना आठवली.

आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संघटनेतर्फे माझा सत्कार भोपाळ येथे होता व मला तिथे येण्यासाठी आमंत्रित करण्यात आलं होतं... माझ्यासारखे पुरस्कार घेणारे बरेच होते. सत्कार समारंभ आटोपल्यानंतर नुकतीच मैत्री झालेल्या कवयित्रीने मला तिचे पुस्तक भेट दिले. मला समीक्षण लिहायला आवडतं आणि समीक्षण करताना मी तीन वेळा तरी पुस्तक वाचतेच... दरवेळी वेगाने अंतरंग उलगडत जाते. कविता मला खूप जवळची म्हणून मी लगेच कवितेचं पुस्तक उघडलं... चाळलं... आणि दोन–तीन तास कविता वाचल्यावर असं वाटायला लागलं की, हे पुस्तक आपण यापूर्वी वाचलंय; पण त्या कवयित्री नागपूरच्या... पुस्तक लायब्ररीत... किंवा कुठे वाचलं म्हणावं तर नुकतेच प्रकाशित झालेलं... मग असं वाटलं की वर्तमानपत्र किंवा मासिकात त्या वाचल्या असतील असं म्हणून मी माझ्या मनाचं समाधान करुन घेतलं... पण काहीतरी सलत होतं... परत पुस्तक वाचलं आणि लक्षात आलं, अरे!... आपण ह्या दुसऱ्या कवितासुद्धा वाचल्या आहेत. माझी उत्सुकता गप्प बसू देईना. मग मी त्या कवयित्रींना विचारलं, तुमचं पुस्तक मला यापूर्वी वाचल्यासारखं वाटतंय. त्यावर... वाचलं असेल... असं म्हणून त्या दुसऱ्या ग्रुपमध्ये गेल्या, पण माझ्या मनातून पुस्तकाचा विचार मात्र जात नव्हता आणि क्षणार्धात सारा प्रसंग आठवला. डोळ्यासमोर तरळला.



सुवर्णाक्षरे

सुवर्णा जाधव, मुंबई
९८१९६२६६४७

प्रो. एक्स माझ्या ऑफीसमध्ये आले... प्रारंभिक संभाषण झालं... त्यांच मराठी जरा हिंदी–मिश्रित होतं... ते हिंदी भाषीच होते. मी विचारलं... माझ्याकडे आपलं नेमकं काय काम आहे? त्यावर ते म्हणाले... तुम्ही लिहिता ते कवितेवरचं समीक्षण मी वाचलं. मी ही कविता लिहिल्यात... पुस्तक प्रकाशित करायचं... त्यांनी पुस्तक दाखवलं. कवितेचं पुस्तक. आपलं नेहमीचं पुस्तक असतं तसंच पुस्तक... फक्त मुखपृष्ठ नाही... प्रस्तावना नाही. मग मी म्हणाले, पुस्तक प्रकाशनाआधीच समीक्षण कसं काय? आणि मुखपृष्ठ नाही... त्यावर ते प्रो. जरा विचारात पडले... तरीही म्हणाले, ते नंतर पाहू... तुम्ही समीक्षण लिहून द्या... मी म्हटलं ठीक आहे. तुमचा फोन नंबर द्या आणि पत्ता द्या. समीक्षण लिहून झाले की पोस्टाने पाठवते. त्यावर पटकन म्हणाले... ''छे! छे! त्याची गरज नाही. मै खुद आके ले जाऊंगा!...'' ''मर्जी तुमची'' मी म्हटलं... प्रो. लगेच आठ दिवसाने आले, पण लिहून झालं नव्हतं कारण मला ऑफीसच्या कामानिमित्त बाहेरगावी जावं लागत होतं. मलाच कसंतरी वाटलं... म्हटलं... ''तुम्हाला उगाच हेलपाटा, तुम्ही नंबर द्या, लिहून झालं की कळवते...'' त्यांनी विषय टाळला आणि म्हटलं, ''नाही त्याची काळजी करू नका. मी येईल'' आणि त्यांना हेलपाटा नको म्हणून त्या संध्याकाळी घरी गेल्यावर प्रथम त्यांचेच पुस्तक हाती घेतले आणि मला सुखद धक्का बसला. एक हिंदी भाषी इतक्या सुंदर मराठीत कविता करतो... छानच! काही कविता छानच होत्या... अर्थपूर्ण...!

खूप वेळा कविता वाचून समीक्षा पूर्ण केली. दुसऱ्या आठवड्यात माझा पत्ता शोधत प्रो. माझ्या घरी आले आणि क्षणभर वाटलं स्वतःचा फोन–पत्ता न देणारा इसम माझ्या घरी मात्र न बोलावताच पत्ता शोधत आला. तरीही त्याच्या अमराठी असूनही मराठी लिहिण्याबद्दल मी कौतुक केलं आणि समीक्षण त्याच्या हाती सोपवलं. नंतर ते प्रो. मला कधीच भेटले नाहीत आणि त्यांनी जे पुस्तक मला माझ्या नव्या मैत्रिणीने दिले होते, तेच ते पुस्तक होते! आता प्रकार लक्षात आला. मैत्रिणीचं पुस्तक त्यावरचे मुखपृष्ठ... प्रस्तावना... प्रकाशन या बाबी लिहिलेलं पान सारं काढून जसच्या तसं पुस्तक त्यांनं स्वतःच्या नावावर केलं होतं... एखादं वाक्य, एखादी कविता चोरली जाते. इथं तर आख्खं पुस्तकच चोरलं होतं. सारं आखल्यामुळे त्या मैत्रिणीला सांगितलं. त्यावर ती म्हणाली, 'तुम्हीच केस करा.'

असो, अशा वाङ्मयचौर्याला काय म्हणावे? केवळ स्वतःच्या नावावर पुस्तक असावे म्हणून अशी चोरी? अशी चोरलेली पुस्तकं छापून प्रतिभावान होता येत नाही आणि मनाचं समाधान? तुम्ही साऱ्या जगाला फसवू शकाल, पण मनाचं काय? ■

# राज्य युवा पुरस्कार छाननी समितीच्या अध्यक्षपदी डॉ. मिलिंद भोई



**पुणे, (प्रतिनिधी) :**

महाराष्ट्र शासनाच्यावतीने दिल्या जाणाऱ्या प्रतिष्ठेच्या राज्य युवा पुरस्कार निवड समितीच्या अंतर्गत स्थापन केलेल्या छाननी समितीच्या अध्यक्षपदी पुण्यातील भोई प्रतिष्ठानचे अध्यक्ष आणि राष्ट्रीय युवा पुरस्कार सन्मानार्थी डॉ. मिलिंद भोई यांची निवड करण्यात आली आहे.

महाराष्ट्राचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री विनोद तावडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत ही निवड करण्यात आली. या बैठकीला राज्याच्या क्रीडा व युवक कल्याण खात्याचे आयुक्त आर. आर. माने, राज्याचे प्रधान सचिव नंदकुमार, उपसचिव अविनाश साबळे, अवर सचिव सु. न. जोशी, अवर सचिव प्र. तु. प्रधान, उपसंचालक एम. बी. मोटे, नेहरू युवा केंद्राचे समन्वयक यशवंत मानखेडकर आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. भोई यांच्या अध्यक्षतेखाली तज्ज्ञांची तांत्रिक समिती स्थापन करण्यात येणार असून या समितीमार्फत राज्यभरातील क्रीडा व युवक कल्याण क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या व्यक्ती व संस्थांच्या प्रस्तावाची छाननी करण्यात येणार आहे. निवड झालेल्या व्यक्ती व संस्थांच्या मुलाखती ही समिती घेणार आहे.

डॉ. मिलिंद भोई यांनी भारत सरकारच्या केंद्रीय नियोजन आयोगात क्रीडा व युवक कल्याण समितीच्या ११ व १२ व्या पंचवार्षिक योजनेतील अभ्यास समितीत तज्ज्ञ सल्लागार म्हणून काम केले आहे. माळीण गाव पुनर्वसन, येरवडा कारागृहातील बंदी बांधवांसाठी सुरू असलेला प्रेरणा पथ प्रकल्प, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या अनाथ मुलांसाठीचा पुण्यजागर प्रकल्प, पूरग्रस्तगाव हेळवाक पुनर्वसन प्रकल्प, मेळघाट जोडो अभियान, गुटखा-तंबाखू व कॅन्सरविषयीचे जाणीव जागृती अभियान आदी प्रकल्पांच्या माध्यमातून गेली २३ वर्षे कार्यरत आहेत. युवा पिढीचे प्रेरणास्थान असणाऱ्या डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या '२०२० मधील विकसीत भारत' ह्या स्वप्नपूर्तीसाठी सुरू केलेल्या 'व्हिजन २०२०' अंतर्गत डॉ. भोई यांनी स्वयंसेवक म्हणून काम केले आहे.

पुणे इंटरनेशनल सेंटर, विघ्नहर्ता न्यास पुणे पोलीस, पुणे पोलीस मध्यवर्ती शांतता समिती आदी संस्थांमधून डॉ. भोई कार्यरत आहेत. तसेच विविध गणेशोत्सव मंडळे व स्वयंसेवी संस्था यांच्यासोबत त्यांचा निकटचा संबंध आहे.

राज्य शासनाने दाखविलेल्या विश्वासास पात्र राहून, तळमळीने व सचोटीने काम करणाऱ्या, समाजातील दुर्लक्षित व तळागाळातील घटकांसाठी काम करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना उजेडात आणण्याचे काम या पुरस्कार निवडीच्या माध्यमातून करू, असे प्रतिपादन छाननी समितीचे अध्यक्ष डॉ. मिलिंद भोई यांनी केले.

# सिरमचे कामगार दुष्काळग्रस्तांच्या पाठीशी



**लोणी काळभोर (वार्ताहर) :**

सिरम इस्टिट्युट ऑफ इंडिया प्रा. लि. हडपसर पुणे मधील सिरम एम्प्लॉइज युनियनच्यावतीने उस्मानाबाद जिल्ह्यातील भूम व परांडा तालुक्यातील दुष्काळग्रस्त २५० कुटुंबांना महिन्याचा किराणा, विद्यार्थ्यांना रोख मदत व सहा आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबांना शेळ्याचे वाटप नुकतेच करण्यात आले.

याविषयी माहिती देताना संघटनेचे अध्यक्ष अजित खैरे व सचिव सचिन तुपे यांनी सांगितले की या भागामध्ये भयंकर दुष्काळामुळे उत्पन्न कमालीचे घटले आहे. शेतीसाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड न झाल्यामुळे शेतकरी आत्महत्या करतोय. येथील शेतकरी ताठ मानेने जगला पाहिजे या उद्देशाने आमच्या संघटनेने पुढाकार घेतला आहे. आम्ही व आमचा कामगार या शेतकऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभा राहणार आहे. तरी यापुढे एकाही शेतकऱ्याने आत्महत्या करू नये, ही विनंती आहे. येथील परिस्थिती अतिशय वाईट आहे. शाळा ओस पडल्या आहेत. मुले शाळेत जात नाहीत. ही परिस्थिती आम्ही बदण्याचा प्रयत्न करणार आहोत. आम्ही आता पाऊस पडल्यावर शेतकऱ्यांना बियाणे पुरवणार आहोत.

सचिन तुपे व अजित खैरे यांनी पुणे शहर व जिल्ह्यातील सर्व उद्योगपती, व्यापारी, बिल्डर व सधन शेतकरी व कामगार संघटनेला असे आवाहन केले की त्यांनी आपली मदत बियाणांच्या रूपाने करावी. आमच्या सिरम एमप्लॉईज युनियन अथवा भूम येथील सहयोग सामाजिक मंडळामार्फत ही मदत देण्यात येईल. त्यामुळे येथील शेतकरी परत कर्ज काढून कर्जाच्या खाईत जाणार नाही व आत्महत्या करणार नाही. शेतकरी खंबीर उभा राहील. यावेळी संघटनेचे अध्यक्ष अजित खैरे, सचिव सचिन तुपे, उपाध्यक्ष अजित भिंताडे, प्रविण घुले, राजू उदरे, रॉयल सेल्वनायगम, अतुल कदम, गणेश तुपे, राजेंद्र जवळकर, जयपाल जाधव, अनिल ठाणगे, राहूल घुले, सोमनाथ सातव, दशरथ कटके, प्रसाद ठेङ्राय आदी उपस्थित होते.

कोणाला जर दुष्काळग्रस्तांना मदत करायची असेल तर पुढील व्यक्तींशी संपर्क करावा.

सचिन तुपे - ९८२२१८८१८८
अजित खैरे - ९६५७१११४१४

## हत्तीदादाची युक्ती

**बालकथा**

एका कोल्ह्याचं पिल्लू फारच लबाड होतं. सगळ्यांना घाबवरणं हाच त्या छोट्या कोल्ह्याचा छंद होता. चुकीच्या गोष्टींमधून तो आनंद घेत होता. त्याला सगळे 'छोटा कोल्हा'च म्हणायचे. छोटा कोल्हा उगाच अफवा उठवायचा. बिचारी तितिर पक्ष्याची पिल्लं शाळेत चालली होती. छोटा कोल्हा त्यांना म्हणाला, ''मैदानात घार येऊन बसलीय. तुम्ही जाताय कधी आणि तुम्हाला ती पकडतेय कधी असं होऊन गेलंय!'' पिल्लं घाबरली. दूरच्या रस्त्याने लपतछपत निघाली. या अनोळखी वाटेवर नदी होती. पिल्लं नदीच्या पाण्यात उतरली. पूर्ण भिजली. तशीच ओलीचिंब शाळेत जाऊन बसली. दुसऱ्या दिवशी आजारी पडली. छोटा कोल्हा फारच आगाऊ झाला होता. त्याला धाकच नव्हता. तो शेतमळ्यात शिरायचा. बुजागवण्याला म्हणायचा, ''ए बुजू, तुला मी घाबरत नाय! तू खोटा आहेस. हिम्मत असेल तर माझ्या मागे धावत ये.'' छोटा कोल्हा भांडणं लावायचा. कावळ्याला त्यानंह सांगितलं, ''पोपट तुझ्या आवाजाला हसतो. कावळीचा आणि कावळ्याचा आवाज एकच कसा? असा म्हणतो.'' मग कावळ्याचं पोपटाचं भांडण झालं. छोट्या कोल्ह्याचं मनोरंजन झालं.

छोट्या कोल्ह्याबद्दलच्या बऱ्याच तक्रारी हत्तीदादाकडे गेल्या होत्या. हत्तीदादा त्या जंगलाचे प्रमुख होते. जंगलात वाघ शिल्लक नव्हता. हवी तक्रार करणाऱ्यांना म्हणाला, ''हे असं का होतंय? विचार करा कारण छोटा कोल्हा रिकामटेकडा आहे. त्याच्या पायांना काम नाही. मी त्याला माझ्या सेवेत घेतो. तुम्ही काळजी करू नका.'' मग हत्तीदादाने छोट्या कोल्ह्याला बोलावून घेतलं. दादा म्हणाला, ''कोल्हू, तू हुशार आहेस. जंगलाची तुला खडान् खडा माहिती आहे. बरोबर ना? मग तू माझ्या नव्या वर्तमानपत्रात का काम करत नाहीस? तुझं कोल्हेकुई शाळेतलं शिक्षण तू घे, थांबवू नको; पण शिकता शिकता कमाई कर. रानातल्या सर्व महत्त्वाच्या बातम्या मला आणून द्यायच्या. मी त्या 'पानांवर' लावण्याचं काम करेन. तू माझा वार्ताहर!'' कोल्हाने आनंदाने जागच्या जागी उडीच मारली. आपण बातमीदार झालो हीच 'बातमी' त्याने प्रत्येक गुहेत जाऊन प्राण्यांना सांगितली. कोल्हेवाडीतल्या इतर कोल्ह्यांनाही या छोट्या कोल्होबाचा अभिमान वाटू लागला. हत्तीदादाची युक्ती यशस्वी झाली.

छोटा कोल्हा फार चांगला वार्ताहर बनला. बातम्या पुरवू लागला. अफवा पसरवण्याचं काम त्याने थांबवलं. खोट्यानाट्या बातम्या हत्तीला चालल्या नसत्या. त्यांचं ते साप्ताहिक वर्तमानपत्र 'वनक्रांती' छानच चाललंय! पगार म्हणून छोट्या कोल्ह्याला ऊस, द्राक्षं, काकड्या मिळतात. वाईटातून चांगलं निघतं ते हे असं!

■ **माधव गवाणकर**, दापोली
९१४५९२४०५३

'चपराक' हे साप्ताहिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम वसंतराव पाटील यांनी वेद प्रिंटर्स, ५१८, शनिवार पेठ, पुणे ४११ ०३० येथे छापून ६१७, साईकृपा, शाहू गणपतीसमोर, शिवाजी रस्ता, शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : घनश्याम वसंतराव पाटील (अंकातील मजकूराशी संपादक कदाचित सहमत असतीलही; वाद विवाद पुणे न्यायालयीन कक्षेत) भ्रमणध्वनी : ७०५७२९२०९२ Email : info@chaprak.com

# हैद्राबादेत रंगले मराठी कवीसंमेलन

**पुणे, (तुषार उथळे-पाटील) :**

हैद्राबाद येथील मराठी साहित्य परिषदेच्या ५८ व्या वर्धापन दिनानिमित्त मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या काशीनाथराव वैद्य सभागृहात मराठमोळे कवीसंमेलन रंगले. 'चपराक'चे सहसंपादक माधव गिर, अंबेजोगाई येथील दिनकर जोशी, मराठवाड्यातील नागेश शेलार, लक्ष्मण खेडकर, शैलजा कारंडे, मेनका धुमाळे, पार्वती फड, गोविंद कुलकर्णी, मराठवाडा साहित्य परिषदेचे कोषाध्यक्ष डॉ. भास्कर बडे यांनी एकाहून एक सरस कविता सादर करत हैद्राबाद येथील मराठी रसिकांची मने जिंकली.




मराठी साहित्य परिषद आणि मराठी महाविद्यालयाच्या वर्धापन दिनानिमित्त 'कथा काव्यसंध्ये'चे आयोजन करण्यात आले होते. हैद्राबाद मराठी साहित्य परिषदेच्या कार्यवाह डॉ. विद्या देवधर, 'चपराक'चे संपादक आणि प्रकाशक घनश्याम पाटील, माधवराजे चौसाळकर, माजी प्राचार्य सुरेश कुलकर्णी, प्राचार्य गोविंद देशमुख, अर्चना अचलेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला.

**आयुष्य पेरले तरी**
**उगवलेच ना काही**
**कालच्या त्या वादळाचे**
**काहीच वाटले नाही**
**भुके रिकाम्या पोटाची**
**झोळी बांधून पाठीला**
**उभी हयात चाललो**
**काटे बांधून पायाला**

या कवी माधव गिर यांच्या सध्याच्या दुष्काळी परिस्थितीत दुर्दम्य आशावाद पेरणाऱ्या कवितेने उपस्थितांची मने जिंकली.

**इथं तुमची लाखाची भाषा**
**त्याला पैशाची नाही आशा**
**त्याच्या हाताच्या पुसल्या रेषा**
**वेचवेचून रानातल्या काशा**

या गिर यांच्या 'माझा राबणारा बाप' या कवितेने गावाकडील शेतकरी बापाची व्यथा रसिकांच्या काळजाला जाऊन भिडली.

कवी दिनकर जोशी यांच्या बहारदार सूत्रसंचालनाबरोबरच त्यांनी सुमधूर आवाजात सादर केलेल्या कवितेने कार्यक्रम वेगळ्याच उंचीवर गेला.

**मी नभाला पुसले आता**
**माझे ओले डोळे**
**झेलत बसलो मातीमधुनी**
**दुष्काळी हिंदोळे**

जोशी यांच्या या कवितेला प्रचंड दाद मिळाली. त्यांच्या 'सोनियाचां पिंपळ' या कवितेने रसिकांच्या मनाचा ठाव घेतला.

शैलजा कारंडे याही नव्या पिढीच्या एक ताकतीच्या कवयित्री! त्यांनी तब्बल दीड हजार कविता रचल्या असून त्या सर्व त्यांना मुखोद्गत आहेत. त्यांच्या कवितेच्या या ओळी पहा –

**साखर नको की तूप नको**
**दूध नको की साय**
**क्षणभरासाठी का होईना**
**हो ना माझी माय!**

लक्ष्मण खेडकर यांनीही प्रभावी शैलीत भटक्या विमुक्तांच्या व्यथा मांडल्या.

**सोन्याचा धूर निघायचा**
**तेव्हाही आम्ही भटकत होतो**
**देश कंगाल झाला तेव्हा**
**आरक्षणाला लटकत होतो**
**देश तुमचीच मक्तेदारी**
**आम्हाला कुठंच वाव नाही**
**अरं, तुमची तरी काय चूक?**
**बोलून चालून भटके आम्ही**
**अजून आमचा गाव नाही!**

या खेडकर यांनी मांडलेल्या व्यथा ऐकून काव्यरसिक हेलावून गेले.

नागेश शेलार यांनी त्यांच्या खड्या आवाजात देशाच्या सद्यस्थितीचे वर्णन जिवंतपणे साकारले.

**कुठल्याच गावचे रस्ते**
**सरळ राहिले नाही**
**कुठल्याच नदीचे पाणी**
**निर्मळ राहिले नाही**

घुमानच्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात गाजलेली 'बाई गं धीट हो' ही कविता डॉ. भास्कर बडे यांनी जोरकसपणे सादर केली.

**रानात जाताना ईळा घे**
**ऑफिसला जाताना सुरा घे**
**वाचवा! वाचवा!!**
**म्हणण्याचे दिवस संपलेत**
**बाई गं धीट हो!**

असा संदेश बडे यांनी एकविसाव्या शतकातील महिलांना दिला.

मेनका धुमाळे, गोविंद कुलकर्णी, पार्वती फड यांनीही एकाहून एक सरस कविता सादर केल्या. हैद्राबादमधील मराठी काव्यरसिकांनी या संमेलनाला उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.

साहित्य परिषदेच्या कार्यवाह डॉ. विद्या देवधर यांनी प्रास्ताविक केले. 'चपराक'चे संपादक घनश्याम पाटील यांनी ओघवत्या शैलीत उपस्थितांशी संवाद साधला. सामाजिक, राजकीय, साहित्यिक घडामोडीबाबत पाटील यांनी आपली भूमिका मांडली. यावेळी डॉ. भास्कर बडे यांनी त्यांची 'खिलाऱ्या' ही कथा 'साभिनय' सादर केली. प्राचार्य गोविंद देशमुख यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## माझ्या 'मराठी'ची बोलू कौतुके!

**पान १ वरून...**

चांगले काम करत आहात. मराठी साहित्य परिषद एक महाविद्यालय चालवते हे भारतातील एकमेव उदाहरण असल्याने तुमच्या कार्याला, मराठी प्रेमाला सलाम करतो.''

हैदराबाद आता तेलंगणात गेले आहे. त्यामुळे तो धागा पकडत मी सांगितले, ''महाराष्ट्रात सध्या विदर्भ, मराठवाडा वेगळा करण्याच्या हालचाली सुरू आहेत. मात्र 'अखंड महाराष्ट्र' हीच 'चपराक'ची भूमिका आहे. सांस्कृतिक एकता जपताना आम्ही भाषिक ऐक्य साधण्याला मात्र भविष्यात प्राधान्य देणार आहोत. किमान पंधरा भारतीय भाषातील साहित्य मराठीत यावे आणि मराठीतील साहित्य या भाषात जावे यासाठी 'चपराक प्रकाशन'चे प्रयत्न असणार आहेत. तेलगू भाषेतील साहित्य मराठीत आल्यास आनंदच वाटेल. तसेच आपल्यापैकी जे प्रतिभावंत सातत्याने, निष्ठेने लिहित आहेत मात्र ज्यांना पुरेसे व्यासपीठ मिळाले नाही त्यांनी 'चपराक'शी हक्काने संपर्क साधावा. आपला आवाज, आपला हुंकार तमाम मराठी बांधवांपर्यंत पोहोचविण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.''

त्यानंतर डॉ. भास्कर बडे यांचे कथाकथन झाले. 'कथा काव्य संध्या' या कार्यक्रमांतर्गत मराठवाड्यातील कवींनी रसिकांची मने जिंकली. माधव गिर, दिनकर जोशी, लक्ष्मण खेडकर, नागेश शेलार, शैलजा कारंडे, गोविंद कुलकर्णी यांच्या एकाहून एक सरस कविता! असा कार्यक्रम जर अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावर झाला तर सांस्कृतिक महाराष्ट्राची विजयी पताका सर्वदूर प्रभावीपणे फडकेल.

सुंदर आणि नेटके नियोजन, शिस्त, दिनकर जोशी यांचे प्रभावी सूत्रसंचालन, अर्चना अचलेकर यांच्या गोड आवाजातील मराठी गीताने झालेली सुरूवात यामुळे कार्यक्रम रंगत गेला. त्यानंतर आम्ही सर्वजण महाराष्ट्र मंडळात आलो. जेवणानंतर लातूरची मंडळी परत जाणार होती. मात्र आम्ही मुक्कामी थांबणार होतो. त्यामुळे त्यांनी त्यांचा बेत बदलला आणि महाराष्ट्र मंडळात आमचे सर्वांचे कवी संमेलन रंगले. रात्री दीडपर्यंत एकाहून एक सरस कवितांचा आस्वाद घेता आला. पहाटे चार वाजता डॉ. भास्कर बडे आणि त्यांचे प्रतिभावंत सहकारी लातूरकडे निघाले.

सोमवार, दि. २५ एप्रिलची सकाळ. आम्ही डॉ. विद्याताई देवधरांच्या घरी पोहोचलो. त्या मूळच्या मुंबईच्या. मात्र मागची साधारण पन्नास वर्षे त्या मराठी भाषेसाठी निर्व्याजपणे कार्य करीत आहेत. त्यांच्या आई सुशीला महाजन. राष्ट्र सेविका समितिच्या संस्थापक सदस्य. वडील राष्ट्रीय स्वयंसेवक संघात सक्रिय. वहिनी सुमित्रा महाजन लोकसभेच्या सभापती. विद्याताईंच्या पहिल्या पुस्तकाचे प्रकाशन थेट अटलबिहारी वाजपेयी यांच्या हस्ते झालेले. वाजपेयी-अडवाणी कुटुंबीयांशी त्यांचे घरोब्याचे संबंध.

मात्र त्यांच्या स्वभावात एक माधुर्य आहे, ममत्त्व आहे. अहंकाराचा लवलेशही नाही. म्हणूनच हैदराबादसारख्या अमराठी शहरात त्यांनी मराठी भाषा जिवंत ठेवली आहे. 'पंचधारा'सारख्या दर्जेदार वाङमयीन नियतकालिकाचे त्या संपादन करतात. सेतू माधवराव पगडी यांच्यावर त्यांनी 'पर्वतप्राय' खंड प्रकाशित केले आहेत. अनेक उत्तमोत्तम पुस्तकांचे संपादन करण्याचा मान विद्याताईंना मिळालाय.

हैदराबादची मराठी माणसं, इथल्या सांस्कृतिक, साहित्यिक चळवळी, मराठी माणसांचे या शहराच्या विकासातील योगदान अशा विषयावर आमची सखोल चर्चा झाली. तेथून आम्ही बाहेर पडलो आणि थेट 'उस्मानिया विद्यापीठ' गाठले. हे एक जगप्रसिद्ध ज्ञानकेंद्र आहे.

अत्यंत आनंदाची आणि अभिमानाची बाब म्हणजे या विद्यापीठात स्वतंत्र मराठी विभाग आहे. डॉ. नम्रता बगाडे या मराठीच्या विभागप्रमुख. नेमक्या आजपासून त्या रजेवर होत्या. त्यामुळे त्यांची भेट झाली नाही. मात्र आम्हाला इथं भेटले प्रा. अरूण कुलकर्णी. ते उस्मानिया विद्यापीठात मराठीचे अध्यापन करतात. आणखी एका महाविद्यालयातही ते मराठी भाषा शिकवतात. त्यांच्यासोबत चहा घेतला आणि आम्ही थेट ग्रंथालयात गेलो.

इथली ग्रंथसंपदा पाहून कुणाचेही डोळे फिरतील. पाच लाखाहून अधिक पुस्तके या ग्रंथालयात आहेत. प्रत्येक भाषेचा वेगळा विभाग. शब्दशः हजारो तरूण-तरूणी येथे वाचत बसले होते. हे चित्र मी महाराष्ट्रातही कुठं पाहिलं नव्हतं. आम्ही या ग्रंथालयातील मराठी पुस्तकांचा विभाग बघितला. वेद उपनिषदांपासून ते कथा, कविता, कादंबरी अशा ललित साहित्यापर्यंत हजारो पुस्तकं इथं आहेत. अगदी मराठीतील सर्व नामवंत दिवाळी अंकही येथे उपलब्ध आहेत. त्यांच्या वेबसाईटवर सर्व पुस्तकांची सुची उपलब्ध आहे. दुर्मिळात दुर्मीळ पुस्तकेही याठिकाणी उपलब्ध असून संशोधकांना, अभ्यासकांना मोठी पर्वणी आहे. मायमराठीचे हे वैभव पाहून आम्ही थक्क झालो.

आपण विविध उपक्रमांनी 'महाराष्ट्र दिन' 'साजरा' करतोय! मात्र ही मंडळी मराठीपण 'जगतात.' महाराष्ट्राबाहेर अनेक शहरात मोठ्या प्रमाणात मराठी माणसं आहेत. ती आपल्या आणि आपल्या राज्यकर्त्यांच्या खिजगणतीतही नसतात. या सर्वांना आपण बळ द्यायला हवे. त्यांचे हात शक्य तितके मजबूत करणे मराठी भाषेसाठी पोषक ठरणारे आहे. अमराठी भागात राहून मराठीची विजयपताका डौलात फडकत ठेवणाऱ्या या सर्वांना महाराष्ट्र दिनानिमित्त वंदन करतो! ■